# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com


**डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५**

**अतितात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१६/ ६४५१

दिनांक :- 13 OCT 2016

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/शासन अनुदानित/विनाअनुदानित

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणी बाबत...**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१६/११३५ दिनांक :- २०/०८/२०१६

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१६/१३५६ दिनांक :- १०/१०/२०१६

३. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/६०६९ दिनांक ०१/०९/२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थेतील अनुसूचित जाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग (ST/VJ/NT Presons With Disability (PWD)) या राखीव प्रवर्गातील प्रवेशित उमेदवारांची प्रकरणे संबंधित संस्था स्तरावरून संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्यानंतर त्यापैकी किती प्रकरणे बनावट आढळली याबाबतचा अहवाल संचालनायालस दिनांक १६/०९/२०१६ पर्यंत विभागीय कार्यालयाकडून संचालनालयास सादर करण्याबाबत सुचित करण्यात आलेले होते.

या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.०३ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग (ST/VJ/NT Presons With Disability (PWD)) या राखील प्रवर्गातील प्रवेशित उमेदवारांच्या प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करण्याबाबत या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात आलेले होते. परंतू आज पर्यंत त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आलेला नाही.

मा.संचालक, यांचे संदर्भिय पत्र क्र.०२ नुसर संबंधित प्राधिकरणाकडून प्रवेशित उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी तात्काळ करून घेण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, प्रवेशित उमेदवारांचे प्रमाणपत्र संबंधित प्राधिकारणकडून तपासणी करण्याबाबत संस्थास्तरावरून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व त्या बाबतचा अहवाल दिनांक १७/१०/२०१६ पूर्वी या कार्यालयास सादर करण्यात यावा, जेणे करून प्राप्त झालेला अहवाल संचालनायास सादर करण्यात येईल याची संबंधित संस्था प्रमुख यांनी नोंद घ्यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

2016-17 Cast